अर्थ व सांख्यिकी आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील सह आयुक्त, गट-अ संवर्गातील अधिकाऱ्यांना अतिरिक्त आयुक्त, गट-अ या संवर्गात पदोन्नतीने पदस्थापना देण्याबाबत..

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग**
**शासन आदेश क्र.पदोनि-१०२६/प्र.क्र.३१/का.१४२७**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
विस्तार इमारत, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- २९/०४/२०२६.

## शासन आदेश

अर्थ व सांख्यिकी आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील सह आयुक्त, गट-अ (राजपत्रित) संवर्गातील खालील तक्त्यात नमूद अधिकाऱ्यांना अतिरिक्त आयुक्त, गट-अ संवर्गात खालील परिच्छेद-२ मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून, या आदेशाच्या दिनांकापासून निव्वळ तात्पुरती स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे. सदर पदोन्नतीनंतर त्यांची पदस्थापना खालील तक्यात त्यांच्या नावासमोर स्तंभ ५ मध्ये दर्शविलेल्या पदावर करण्यात येत आहे :-

| अ. क्र. | नाव | प्रवर्ग | सध्याचे पद व कार्यालय | पदोन्नतीनंतर पदस्थापना करण्यात आलेले पद व कार्यालय |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | **श्री. विकास व. कुलकर्णी** | **खुला** | सह आयुक्त, राज्यपालांचे सचिव कार्यालय, लोकभवन, मुंबई. | अतिरिक्त आयुक्त, (नियोजन) अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय, मुख्य कार्यालय, मुंबई. (नवीन आकृतीबंधानुसार) |
| २ | **श्री.अमोल अ. खंडारे** | **खुला** | सह आयुक्त, (राष्ट्रीय उत्पन्न) अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय, मुंबई. | अतिरिक्त आयुक्त, (राज्य उत्पन्न) अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय, मुख्य कार्यालय, मुंबई. (नवीन पदावर) |
| ३ | **श्रीमती रुपाली प्र. थोते** | **खुला** | सह आयुक्त, (इ.आ.सं.के.) अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय, मुख्य कार्यालय, मुंबई. | अतिरिक्त आयुक्त, (समन्वय) अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय, मुख्य कार्यालय, मुंबई. (रिक्त पदावर) |

२. सदर पदोन्नती खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून देण्यात येत आहे :-

(१) सदर आदेशानुसार पदोन्नतीच्या पदाचा पदभार स्वीकारावा व तसे केल्याबद्दलचे कार्यभार हस्तांतरण प्रमाणपत्र शासनास सादर करण्यात यावे व त्याची एक प्रत आयुक्त, अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय, मुंबई यांना अग्रेषित करावी. पदोन्नती स्वीकारावयाची नसल्यास तसे लेखी स्वरुपात शासनास कळवावे.

(२) मा. सर्वोच्च न्यायालयातील विशेष अनुमती याचिका क्र. २८३०६/२०१७ मधील निर्णयास अधीन राहून सदर निव्वळ तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे.

(३) रिट पीटीशन स्टॅम्प नं. १०८७६/२०२१ व रिट पीटीशन स्टॅम्प नं. १०८७८/२०२१ मध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक २५/५/२०२१ रोजी दिलेल्या निर्णयानुसार सदर पदोन्नती नमूद रिट याचिकेत होणाऱ्या निर्णयाच्या अधीन राहील.

(४) सदर पदोन्नती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

(५) पदोन्नतीच्या पदावर रुजू झाल्यानंतर अधिकाऱ्यांनी ७ दिवसांच्या आत त्यांचे ई-प्रोफाईल सुधारीत करुन त्याची प्रत शासनास, तसेच अर्थ व सांख्यिकी आयुक्तालयास सादर करावी. प्रत सादर न केल्यास त्यांचे चालू महिन्याचे वेतन अदा केले जाणार नाही.

(६) या पदोन्नतीने सदर अधिकाऱ्यांना नियमित पदोन्नतीचे म्हणजेच ज्येष्ठतेचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत.

३. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा सांकेतांक क्रमांक २०२६०४२९१६१८४५६७१६ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

CHARUSHILA
DEVENDRA
CHAUDHARI

Digitally signed by CHARUSHILA DEVENDRA CHAUDHARI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PLANNING DEPARTMENT,
2.5.4.20=B99D7DCA0E63BE1BD1B7158B9523537DCC1D46BC8077686 47A9ED4FF3816ECF3, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=A75E4CF904B78F2AE051843EA1BA6106A393C2B0CF60 FE03C945913B2BAE935F, cn=CHARUSHILA DEVENDRA CHAUDHARI
Date: 2026.04.29 16:19:40 +05'30'

**(चारुशीला चौधरी)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ व २ मुंबई/नागपूर.

२) महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र-१ व २ मुंबई/नागपूर.

३) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.

४) मा. उपमुख्यमंत्री (रा.ऊ.शु., अल्पसंख्यांक व क्रिडा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

५) मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

६) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.

७) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.

८) आयुक्त, अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय, मुंबई.

९) सर्व विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त यांचे कार्यालय, कोकण, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर

१०) विशेष आयुक्त, अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय, मुंबई.

११) सहसचिव / उपसचिव, सामान्य प्रशासन विभाग (का.१२/१३/१६-ब/२१), मंत्रालय, मुंबई.

१२) सर्व सहसचिव/उपसचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.

१३) सह आयुक्त, अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय, प्रादेशिक कार्यालय, कोकण , पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर.

१४)सह आयुक्त (नियोजन), विभागीय आयुक्त यांचे कार्यालय, कोकण, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर.

१५) उप आयुक्त (प्रशासन), अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय, मुंबई.

१६) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

१७) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.

१८) सचिव, नियोजन विभाग यांचे वरीष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.

१९) संबंधित अधिकारी (अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय, मुंबई यांचेमार्फत)

२०) निवडनस्ती.